# पाणी संवर्धन कार्यक्रम 2017-18

**दि. १० ते १६ फेब्रुवारी २०१८**

**तलाव खोलकरण व गाळ उपसा उपक्रम :**

विशेष युवक शिबिराच्या कालखंडात मौजे भोकरंबा येथील तलावाचे ग्रामस्थांच्या सहकार्याने शिबिरार्थी स्वयंसेवकांनी तलाव खोलीकरणाचा उपक्रम प्रभावीपणे राबविला गावाच्या तलावातील गाळउपसा करून जलसाठा करण्याची सोय ग्रामस्थांना करून देण्यात आली. या उपक्रमाप्रसंगी मौजे भोकरंबा गावातील सरपंच श्री. रामहरी गोरे उपसरपंच श्री. सुदिप भिसे व डॉ. शिवाजी भिसे व गावातील ग्रामस्थांनी उत्स्फूर्तपणे शिबिरार्थी स्वयंसेवकांना सहकार्य केले व गावामध्ये एक आगळा-वेगळा उपक्रम राबविला. या वेळी महाविद्यालयाचे रासेयो कार्यक्रमाधिकाऱ्यांनी गावात पुढाकार घेत एकात्मतेची भावना निर्माण केली व विशेष योगदान दिले. हा पाणी संवर्धनाचा कार्यक्रम गावकऱ्यांच्या सहभागातून राबविण्यात आला. यामध्ये रासेयोच्या १७५ स्वयंसेवकांनी उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदवला. या कार्यक्रमामध्ये मध्ये कार्यक्रमाधिकारी डॉ. के. डी. सावंत, डॉ. पुष्पलता कावळे, प्रा. विजय गवळी यांनी विद्यार्थ्यांना पाणी संवर्धनाच्या तंत्राची माहिती देत भोकरंबा गावामध्ये शेततळे, बंधारे यामधील गाळ उपसा केला.




